Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# लोकसंख्या वाढीची कारणे आणि उपाय

**रोशन दादाजी मेश्राम**
संशोधक विद्यार्थी,
मु.पो :- अऱ्हेरनवरगांव, ता. ब्रम्हपुरी,
जि. चंद्रपूर, पिन कोड- 441 206
Mb. 9637808216 rmeshram72@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारताने आज २१ व्या शतकामध्ये पदार्पन केले असले तरी, भारतामध्ये आजही वेगवेगळ्या समस्या उभ्या आहेत. त्यातील अतिशय महत्वाची समस्या म्हणजे दिवसे न् दिवस वाढणारी लोकसंख्या ही होय. लोकसंख्या वाढ ही आपल्या भारत देशापुढील प्रमुख आणि महत्वाची समस्या आहे. स्वातंत्र्यानंतर ६५ वर्षांत आपल्या देशाची लोकसंख्या १२१ कोटींच्याही वर पोहचली आहे. भारतामध्ये प्रत्येक दीड सेकंदाला एक मुलगा जन्माला येत आहे. या हिशोबाने प्रत्येक दिवसाला भारताची लोकसंख्या सुमारे ५५,००० ने वाढत असल्याने प्रती वर्षी २.१० कोटींवर जात आहे.

भारतामध्ये लोकसंख्या वाढीचा वेग १.८% आहे. याच गतीने जर आपल्या भारत देशाची लोकसंख्या वाढत राहीली तर २०५० सालापर्यंत ती १९० कोटींपर्यंत जाईल. एवढ्या प्रचंड लोकसंख्येला अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजा पुरविणे कठिण होईल. देशामध्ये आजही २१% लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असल्याचे आपणास दिसून येत आहे. ३७% लोकांना दररोज किमान एका वेळेचे जेवणही मिळत नाही. त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आणि देशातील या सर्व सामाजिक व आर्थिक समस्यांचे मुळ म्हणजे लोकसंख्या वाढ हेच आहे.

लोकसंख्या वाढ हा आर्थिक विकासावर परिणाम करणारा अतिशय महत्वाचा क्रियाशील घटक आहे. मानवी संसाधन विकासावर परिणाम करणारा तो संस्थात्मक स्वरूपाचा पैलू आहे. हा पैलू ज्याप्रमाणे उपयुक्त आहे अगदी त्याचप्रमाणे तो आर्थिक विकासामध्ये अडथळा निर्माण करणाराही ठरतो. जर लोकसंख्या पर्याप्त असेल, तर आर्थिक विकासास हातभार लागतो. याउलट लोकसंख्या अतिरिक्त असेल तर ती आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण करते. लोकसंख्येमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त वाढ झाली, तर नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण येतो. लोकसंख्येचा विस्फोट ही भारतीय अर्थव्यवस्थे समोरील फार मोठी समस्या आहे. जगामध्ये सर्वाधिक जास्त लोकसंख्या वाढीचा दर भारतात आहे. त्यामुळेच लोकसंख्येचा विस्फोट घडून येतो. भारताची लोकसंख्या ही फार विशाल आणि झपाट्याने वाढणारी आहे. त्यामुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अनेक अडचणी येत आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. लोकसंख्या वाढीच्या कारणांचा शोध घेणे.
२. लोकसंख्या वाढीवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. लोकसंख्या वाढीचा दर वाढत असल्याचे दिसुन येते.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. शोधनिबंध हा पूर्णपणे व्दितीय स्त्रोतांवर आधारलेला आहे. यामध्ये वर्तमानपत्र, शासकीय संकेतस्थळे, शासनाचे अहवाल, इंटरनेट त्याचप्रमाणे संदर्भ पुस्तके वापरण्यात आले आहेत.

**भारतीय लोकसंख्या वाढीची कारणे :-**

**१. सार्वत्रिक विवाह :-**

भारतामध्ये विवाह ही एक सार्वत्रिक प्रथा आहे. ती एक सामाजिक आणि धार्मिक प्रथा असल्याने बव्हंशी स्त्री आणि पुरूष विवाहबद्ध होतात. वंशसातत्यासाठी विवाह हे एक धार्मिक बंधन आहे असे समजल्या जाते. धार्मिक किंवा सामाजिक कर्तव्य म्हणून बहुतेक सर्वच लोक विवाह करतात. आयुष्यभर ब्रम्हचारी राहणे ही गोष्ट अतिशय निंदनीय मानली जाते. भारतामध्ये विवाह लवकरात लवकर केल्या जातो. लवकर विवाह झाल्याने स्त्रियां या जास्त मुलांना लवकर जन्माला घालतात. पूर्वीच्या काळामध्ये विधवा विवाहाला मान्यता नव्हती. परंतु आता अशा विवाहास कायदेशीर मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक विधवा विशेषत: तरूण विधवा विवाह करतात. भारतामध्ये बहुपत्नीत्वाची प्रथा ही दीर्घकाळ चालू होती. यामुळे जन्मदर हा उच्च राहीला आहे. अशाप्रकारे विवाहाची सार्वत्रिकता, लवकर विवाह करणे, विधवा विवाह आणि बहुपत्नीत्वाची प्रथा या वैवाहिक घटकांचा प्रभाव पडून जन्मदर हा उच्च राहीला आहे.

**२. निरक्षरता :-**

भारतामधील अनेक लोक हे अजुनही निरक्षर आणि अद्यानी आहेत. ते रूढी, परंपराप्रिय आणि अंधश्रद्धाळू आहेत. कुटुंबामध्ये अनेक मुले असणे ही गोष्ट अनेक समस्यांच्या निर्मितीस कारणीभूत ठरते. ही गोष्ट त्यांना समजत नाही. कुटुंब मोठ्या आकाराची असणे म्हणजे अधिक मनुष्यबळ असणे असे ते समजतात. म्हणून ते अनेक मुले जन्माला घालतात. अशाप्रकारे अज्ञान हे लोकसंख्या वाढीस जबाबदार ठरते.

**३. दारिद्रय :-**

गरिबीने जन्मदर वाढण्यास मदत होते. बरेच लोक अज्ञानी असल्यामुळे त्यांना कुटुंबनियोजनाच्या फायद्यांची जाणीव नसते. अशा लोकांना मुले म्हणजे देवाने दिलेली देणगी होय असे वाटत असते. प्रत्येक अतिरिक्त मुल कुटुंबाला अधिक उत्पन्न देऊ शकेल अशा प्रकारचा विचार ते लोक करतात.

**४. धार्मिक घटक :-**

भारतामध्ये अनेक लोक मुला-मुलींचा जन्म होणे हे देवाची देणगी आहे असे माणतात. हिंदूंच्या दृष्टिने अंत्यविधी पार पाडण्यासाठी पुत्रप्राप्ती होणे धार्मिक दृष्ट्या आवश्यक ठरते. मुलाने अंत्यविधी पार पाडल्याशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही, असे हिंदू लोक मानतात. लवकर विवाह केल्यास लवकरात लवकर

पुत्रप्राप्ती होईल असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे ते पुत्रप्राप्ती होईपर्यंत संतती जन्मास घालण्याचे थांबवीत नाहीत.

**५. भोगोलिक घटक :-**

भारतामधील हवामानासारखा भोगोलिक घटकदेखील जन्मदर वाढविण्यास सहायक ठरला आहे. भारतातील उष्ण हवामानामुळे लैंगिक भावना ही अधिक उत्तेजीत होते. उष्ण प्रदेशातील लोकांची लैंगिक भावना ही अधिक चाळवली जाते. तसेच उष्ण हवामानामुळे मुली ह्या लवकरच म्हणजे वयाच्या ११ ते १५ या कालावधीमध्येच वयामध्ये येतात. त्यामुळे त्यांचा प्रजोत्पादनाचा कालावधी अधिक असतो.

**६. मनोरंजनाचा घटक :-**

अनेक लोकांना विशेषत: ग्रामीण व आदिवासी लोकांना मनोरंजन सुविधा पुरेशा प्रमाणामध्ये मिळत नसल्यामुळे लैंगिक सुखोपभोग मिळविणे हेच त्यांच्यासाठी मनोरंजनाचे एकमेव साधन असते. परंतु लैंगिक सुखोपभोगाच्या परिणामाचा ते कधिच विचार करत नाही. यामुळेच जन्मदरामध्ये वाढ होत असते.

**७. स्त्रियांचा निम्न दर्जा :-**

पूर्वीच्या काळामध्ये भारतामध्ये स्त्रियांचे क्षेत्र हे फक्त आणि फक्त चूल आणि मुल एवढ्यापुरतेच मर्यादित होते. स्त्रिया कुटुंबाच्या कोणत्याही महत्वपूर्ण निर्णयामध्ये सहभागी होऊ शकत नव्हत्या. हे सुद्धा उच्च जननदराचे कारण होते.

**८. संयुक्त कुटुंब व्यवस्था :-**

भारतामध्ये संयुक्त कुटुंब पद्धती दीर्घकाळापासून प्रचलित होती. संयुक्त कुटुंबपद्धतीत सदस्यांच्या सर्व गरजा ह्या कुटुंब प्रमुखकडूनच पूर्ण केल्या जात होत्या. मुलांच्या संगोपणाची फारशी जबाबदारी व्यक्तिगत सदस्यांवर पडत नाही. त्यामुळे एखाद्यास अधिक मुल झाली तरी त्यांची काळजी कुटुंब प्रमुखाला घ्यावी लागते. त्सामुळे अधिक मुले ही आपली जबाबदारी आहे. असे न मानता संयुक्त कुटुंबातील सदस्य हे अपत्यांना जन्मास घालत राहतात.

**९. कुटुंब नियोजनाविषयीच्या जागृतीचा अभाव :-**

अनेक लोकांना संतती नियमनाच्या साधनांच्या उपलब्धतेविषयीची जाणीव नाही. ज्यांना ही जाणीव आहे. ते लोक धार्मिक, सामाजिक व इतर कारणास्तव ही साधणे वापरण्यास नाखूष आहेत. कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत केवळ स्त्रीयांवरील निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेवर भर दिला जातो. लोकांना दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान या गोष्टी कुटुंब नियोजनाविषयीच्या अभावास मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत.

**मृत्युदरांमध्ये घट होण्याची कारणे :-**

**१ .वैद्यकीय व आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा :-**

वैद्यकीय विज्ञानामध्ये झालेली प्रगती, प्रतिजैविक औषधांचा शोध व आरोग्य सुविधांचा झालेला विस्तार यामुळे मृत्युदरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये घट झालेली आहे. प्लेग, पटकी, देवी, मलेरिया, क्षय, पोलिओ इत्यादी जीवघेण्या आजारांवर नियंत्रण मिळविण्यामध्ये मानवाला यश मिळाले आहे. प्रत्येक खेडयामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना झाल्यामुळे पूर्वीच्या काळामध्ये आरोग्य सेवांपासून वंचित असलेल्या ग्रामीण लोकांच्या दारापर्यंत आरोग्यसेवा पोहचल्या आहेत. तसेच सरकारणे चांगल्या पिण्याच्या

पाण्याचा पुरवठा, वीज, सुधारीत सांडपाण्याची व्यवस्था, शाळेतील मुलांना व गर्भवती स्त्रियांना पोष्टिक आहार अशा सुविधा पुरविणे सुरू केले आहे. यामुळे लोकांचे आरोग्य सुधारले आहेत. या सर्व कारणांमुळे मृत्युदरामध्ये घट झाली व लोकांचे अपेक्षित आयुर्मान वाढले तसेच मृत्युपासून संरक्षण झालेल्या लोकांनी नवीन मुले जन्माला घालून लोकसंख्येमध्ये भर घातली आहे.

**२. नैसर्गिक आपत्तींवर नियंत्रण :-**

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पूर्वीच्या काळी बरेच लोक मृत्यु पावत होते. परंतु आज मात्र विज्ञानाच्या प्रगतीमुळे पूर, चक्रिवादळ, भूकंप, त्सुनामी इत्यादींविषयी पूर्वकथन वेळीच करता येवू शकते. तसेच नैसर्गिक आपत्तीने प्रभावित झालेल्या लोकांना वेळेमध्ये वैद्यकीय मदत पुरविली जाऊ शकते. पुराचा धोका टाळण्यासाठी सरकारणे अनेक उपाय योजलेले आहेत. दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारणे व स्वयंसेवी संघटनांनी विविध उपाययोजणा केलेल्या आहेत. वाहतुक आणि संप्रेषण साधनांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे उपासमारीतून होणारे मृत्यु मोठ्या प्रमाणामध्ये कमी झालेत. परिणामी कमी झाला.

**३. जीवनमानात सुधारणा :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने आर्थिक व सामाजिक विकासाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. त्यामुळे लोकांना विविध सोईसुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. रोजगाराच्या संधी वाढल्यामुळे दरडोई उत्पनामध्ये सुद्धा वाढ झाली आहे. यामुळे चांगले पोष्टीक व सकस आहार, अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सोईसुविधा इत्यादींचा उपयोग करण्याची संधी लोकांना मिळू लागली. परिणामी लोकांच्या जीवनमानामध्ये सुधारणा झाल्यामुळे मृत्यूदर घटण्यास मदत झाली.

**४. शिक्षणाचा प्रसार :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने शैक्षणिक सोईसुविधा मोठ्या प्रमाणामध्ये लोकांना पुरविल्या आहेत. लोकांमध्ये आरोग्यविषयक जाणीव जागृती निर्माण झाली. यामुळे ते आपापल्या कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी घेऊ लागले. परिणामी मृत्यूदर घटण्यास चालणा मिळाली.

**लोकसंख्या वाढीवर नियंत्रण मिळविण्यासाठी काही उपाययोजना :-**

१. पुरूषांना संततिनियमनाची म्हणजेच गर्भनिरोधक साधने आणि स्त्रियांना गर्भनिरोधक गोळ्या परवडणाऱ्या किमतीत आणि काही वेळा मोफत सुद्धा पुरविणे गरजेचे आहे.
२. स्त्रीपुरूषांवर निर्बीजीकरणाच्या म्हणजेच नसबंदीच्या शस्त्रक्रिया करणे.
३. कुटुंब नियोजनाचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार होण्यासाठी सर्व प्रकारची प्रसार माध्यमे वापरणे.
४. सरकारणे कुटुंब नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक आणाऱ्या वैद्यकीय सुविधा भारतभर उपलब्ध करून देण्यासाठी कुटुंब नियोजन केंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे.
५. लोकसंख्या वाढीस आळा घालण्यासाठी सरकारणे काही कायदेशीर तरतुदी करणे आवश्यक आहेत.
६. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विवाहाच्या वयोमर्यादेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.
७. दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तिला सरकारी नोकरीमध्ये तसेच स्वशासनाची निवडणूक लढविण्यास अपात्र ठरवावे.
८. नसबंदीच्या शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तिला सरकारकडून प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात यावेत.

९. लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामांची लोकांना विशेषत: विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्यासाठी सरकारने शालेय अभ्यास क्रमांमध्ये लोकसंख्या शिक्षणाचा समावेश करावा.

१०. स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार करावा.

११. स्त्रीयांचा दर्जा उंचवावा.

**मुल्यमापन :-**

लोकसंख्या वाढ नियंत्रणात करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनेस अपेक्षित यश मिळालेले नाही. कारण कुटुंब नियोजन या कार्यक्रमास काही मर्यादा आहेत- काही लाके हे धार्मिक आधारावर कुटुंब नियोजन व गर्भपात यास विरोध करतात. अनेकजन जन्मदर रोखण्याच्या पद्धतींचा सहजासहजी स्वीकार करत नाहीत. अनेकांना संतती नियमनाची साधने, नसबंदीच्या शस्त्रक्रियाबाबतची पुरेशी माहिती नाही. कुटुंब नियोजनाचा संदेश पाहिजे त्या प्रमाणामध्ये खेड्यापाड्यांमध्ये पोहचलेला नाही. एवढेच नव्हे तर लोक हे अनेक मुलांना जन्म दिल्यानंतर नसबंदी करत असतात.

**ग्रंथ सूची :-**

१. डॉ. कानेटकर तारा, डॉ. काळदाते सुधा, लोकसंख्या आणि समाज, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद.

२. डॉ. काचोळे कैलाश, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

३. शिंदे लिला, चौधरी लता, लोकसंख्या आणि समाज, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

४. शास्त्री सुधाकर, भारतीय अर्थव्यवस्था, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

५. श्रीवास्तव सतिश, कुलकर्णी एस. एन, लोकसंख्या आणि लोकशिक्षण विद्या पब्लिकेशन, औरंगाबाद.

६. मिश्र आणि पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिकेशन, दिल्ली.

७. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता, दिल्ली.

८. अर्थ व सांख्यिकीय संचालनालय,महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०११-१२, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

९. Economis and Political weekly F. (2010).

**१०.** R. P. Tiwari, (1986), Population Education Parkash Publishers, Ludhiana

**११.** S. N. Aarwala, U. P. Sinha India Population Problems, Tata McGraw-Hill Publishing Company Ltd. New Delhi.

**१२.** www.wikipedia.com.